महाराष्ट्र शासन
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र.तंशिप्र-१२२४/प्र.क्र.०३/सीईटी/२०२४/१३७६ दिनांक - ०९/०८/२०२४.

# जाहीर सूचना
## बी.बीसीए/ बीबीए/बीएमएस/बीबीएम-सीईटी २०२४ (फेज-२)

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून घेण्यात आलेली बी.बीसीए/ बीबीए/बीएमएस/बीबीएम-सीईटी २०२४ (फेज-२) ऑनलाईन प्रवेश परीक्षा दिनांक ०४ ऑगस्ट, २०२४ रोजी घेण्यात आलेली आहे. सदरील परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्न, उत्तराचे पर्याय आणि उत्तर तालिकावर उमेदवाराला आक्षेप असल्यास, उमेदवाराना https://cetcell.mahacet.org/ लॉगिनद्वारे प्रती प्रश्न रुपये १,०००/- शुल्क भरुन **दिनांक १०/०८/२०२४ ते १२/०८/२०२४ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत** आक्षेप पोर्टलची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. इतर कोणत्याही पद्धतीद्वारे प्राप्त झालेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

आक्षेप पोर्टल संदर्भात कार्यप्रणाली खालीलप्रमाणे -

१. परीक्षा दिल्यानंतर उमेदवारांच्या लॉगीन आयडीवर उमेदवारांची प्रश्नपत्रिका, उमेदवाराने दिलेले उत्तरे आणि राज्य सीईटी कक्षांकडून प्रश्नांचे अचूक उत्तरे प्रसिध्द करण्यात येईल.

२. तद्नंतर परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेतील कोणत्याही प्रश्नांवर उमेदवाराला आक्षेप असल्यास प्रती प्रश्न/ आक्षेप रुपये १,०००/- शुल्क भरुन आक्षेप नोंदविता येईल.

३. आक्षेप नोंदणी झाल्यानंतर आक्षेपाचे निराकरण करुन सीईटी कक्षाच्या संकेतस्थळावर सूचना प्रसिध्द करण्यात येईल.

सदरील आक्षेप पोर्टलबाबत सीईटी कक्षाच्या संकेतस्थळाचे अवलोकन करावे. आक्षेपांचे निराकरण झाल्यानंतर संबंधित परीक्षांचे निकाल घोषित करण्यात येईल, यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

सही/-
आयुक्त
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, मुंबई